प्रकाशान नं . Booklet/Dr.PDKV/PUB/793/20226

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# युवक महोत्सव
# २०२५-२६











इंद्रधनुष्य
महोत्सव २०२४-२५

## माहिती पुस्तिका

संकलन

**डॉ. संदीप हाडोळे**
विद्यार्थी कल्याण अधिकारी
विद्यापीठ सांस्कृतिक समन्वयक

**डॉ. मंजुषा देशमुख**
सहा.प्राध्यापक शारीरिक शिक्षण
पदव्युत्तर शिक्षण संस्था
सांस्कृतिक समन्वयक

# आमचे प्रेरणास्थान



कृषि क्रांतीचे शिल्पकार : शिक्षणमहर्षी, कृषिरत्न

**डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख**

जन्म : २७ डिसेंबर, १९९८    महानिर्वाण : १० एप्रिल, १९६५

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कलाप्रकार निहाय यादी | 1 |
| २. | कलाप्रकारांची माहिती व नियमावली | 2-10 |

# कलाप्रकार निहाय यादी (List of the Event)

**1) संगीत विभाग**

१. भारतीय शास्त्रीय गायन (भारतीय/कर्नाटकी) (Indian Classical
२. भारतीय शास्त्रीय वाद्य एकल (तालवाद्य)
३. भारतीय शास्त्रीय वाद्य एकल (तालवाद्यविरहित)
४. नाट्यगीत (Natyageet)
५. इंडियन लाईट व्होकल - इंडियन
६. भारतीय समूह गीत
७. इंडियन फोक ऑर्केस्ट्रा
८. पाश्चात्य गायन - एकल
९. पाश्चिमात्य वाद्य संगीत (Western Instrumental - Solo)
१०. पाश्चिमात्य समूहगान (Group Song - Western)

**२) नृत्य विभाग** (Dance Section)

११ लोक /आदिवासी (भारतीय) (Flik /Tribal Dance)
१२. शास्त्रीय नृत्य (भारतीय) (Classical Dance)

**३) वाङ्मयिन कला विभाग**

१३. वक्तृत्व स्पर्धा (Elocution)
१४. वादविवाद स्पर्धा (Debate)
१५. प्रश्नमंजुषा (Quiz)

**४) रंगमंच कला विभाग**

१६. नक्कल (Mimicry)
१७. माइम
१८. स्किट
१९. प्रहसन (Skit)

**५) ललित कला विभाग**

२०. स्थळचित्र (On the Spot Painting)
2१. चिकटकला (Collage)
२२ पोस्टर मेकिंग (Poster Making)
२३. मातीकला (Clay Modelling)
२४. व्यंगचित्रे (Cartooning)
२५. रांगोळी (Rangoli)
२६. स्थळ छायाचित्रण (Spot Photography)
2७. इंस्टालेशन (Installation)

६. लघु चित्रपट (Short Film Making

७. शोभा यात्रा (Procession)

# कलाप्रकारांची माहिती आणि नियमावली

## १. संगीत विभाग (Music Section)

### १) भारतीय शास्त्रीय गायन (Indian Classical Vocal Solo)

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ ०१ (एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होईल

२. स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय / कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.

३ सादरीकरणाकरिता किमान ०८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

४. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.

५. सदर कला प्रकाराकरिता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.

६. राग किंवा रचनेची निवड करीत असतांना स्पर्धकांनी पुरेसा विचार व काळजी घ्यावयाची आहे.

७. या स्पर्धेध्ये चित्रपटातील गीतांचे सादरीकरण करता येणार नाही.

८. परीक्षकांचा निर्णय ताल, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारित राहील.

२.

### २)भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) (Indian Classical Instrumental Solo Percussion)

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ ०१ (एक) स्पर्धक सहभागी होईल.

२. स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय / कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.

३ सादरीकरणाकरिता किमान ०८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.

४. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

५. सदर कला प्रकाराकरिता कमाल एका साथीदाराचा वापर करण्यात येईल.

६. सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरिता स्वतःची वाद्ये आणावी लागतील.

७. परीक्षकांचा निर्णय ताल, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारित राहील.

### ३ ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य) (Indian Classical Instrumental Solo- Non Percussion)

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ ०१ (एक) स्पर्धक सहभागी होईल.
२. स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय / कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
३. सादरीकरणाकरिता किमान ०८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
४. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
५. सदर कला प्रकाराकरिता कमाल एका साथीदाराचा वापर करण्यात येईल.
६. सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरिता स्वतःची वाद्ये आणावी लागतील. प्रक्रियक वाद्याचा (सिन्थेसायझर) उपयोग करता येणार नाही.

### ४) नाट्यसंगीत (Natyasangeet - Solo Event)

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. कोणत्याही भारतीय नाटकातील नाट्यपद/नाट्यगीत प्रकार सादर करता येईल (ओवी व भावगीत सोडून).
३. सादरीकरणाकरिता किमान ०५ मिनिटे व कमाल ०७ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
४. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
५. सदर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करण्यात येईल
६. चित्रपटातील नाट्यपदांचे सादरीकरण करता येईल.
७. परीक्षकांचा निर्णय स्वर, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारित राहील.

### ५) भारतीय सुगम संगीत (Indian Light Vocal)

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ ०१ (एक) स्पर्धक सहभागी होईल.
२. सादरीकरणाकरिता किमान ०४ मिनिटे व कमाल ०६ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
३. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
४. सदर कला प्रकाराकरिता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
५. गैरचित्रपट गीते, गझल, भजन आणि अभंग या कलाप्रकारात सादर करता येईल.
६. स्वर, ताल रचना आणि सर्वसाधारण सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारित राहील.

### ६) भारतीय समूहगान (Indian Group Song)

१. प्रत्येक महाविद्यालयतून एक संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२. एका संघामध्ये कमाल ०४ (चार) गायक आणि कमाल ०६ (सहा) साथीदारांचा समावेश राहील. तथापि, गायक हे सादरीकरणादरम्यान वाद्ये वाजवू शकतील.
३. प्रत्येक संघाला दोन गाण्यांचे सादरीकरण करावे लागेल ज्यामध्ये एक गीत देशभक्तीपर तर दुसरे गीत लोकसंगीतावर आधारित राहील.
४. चित्रपट गीते सादर करता येणार नाहीत. समुहगीत कोणत्याही भारतीय प्रादेशिक किंवा राष्ट्रिय भाषेतले असावे.
५. प्रत्येक संघाला सादरीकरणाकरिता किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा वेळ उपलब्ध राहील. ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापि मंच व वाद्य रचनेकरिता ०५ (पाच) मिनिटांपेक्षा अधिक कालावधी देण्यात येणार नाही. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
६. सदर कला प्रकाराकरिता कमाल ०३ (तीन) सहवादकांचा वापर करता येईल तथापी सहभागी स्पर्धक वाद्य ही वाजवू शकतील.

**७) भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद (Indian Folk Orchestra - Group Event)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून एक संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. एका संघामध्ये साथीदारांसह किमान ६ (सहा) व कमाल ९ (नऊ) स्पर्धक आणि कमाल ३ (तीन) साथीदार सहभागी होऊ शकतील. साथीदारांची वेषभूषा ही सहभागी विद्यार्थ्यांच्या वेषभूषेपेक्षा वेगळी असावी.
३. केवळ मुले/मुली किंवा मिश्र पध्दतीचा समूह यामध्ये सहभागी होऊ शकेल.
४. सादरीकरणाकरिता किमान ०८ व कमाल १० मिनिटांचा कालावधी कलावंतांना उपलब्ध राहील. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
५. वाद्य, मंच रचनेकरिता कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी राहील
६. महाराष्ट्रातील लोकसंगीतावर आधारीत वाद्याचा व लोकसंगीताचाच वापर करावा लागेल.
७. चित्रपटातील लोकसंगीताची धुन बापरता येणार नाही.
८. व्यावसायिक साथीदारांना विद्यार्थी कलावंतापासून काही अंतारावर उभे / बसून सादरीकरण करता येईल. मात्र त्यांना चमूचे नेतृत्व करता येणार नाही.
९. लोकसंगीतातील ज्या स्वरमालिकांना लोकसंगीत म्हणून अधिद्वत मान्यता आहे अशा स्वरमालिकांची प्राधान्याने निवड करण्यात यावी.
१०. परीक्षकांचा निर्णय हा केवळ सादरीकरणाच्या अस्सलपणा आधारित राहील. यामध्ये रंगभूषा, वेशभूषा व चमूच्या हावभावावर गुणदान करण्यात येणार नाही.

**८) पाश्चिमात्य गायन (Western Vocal-Solo)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. गाणे केवळ इंग्रजी भाषेतील असावे.
३. स्पर्धक एकापेक्षा जास्त गाणे दिलेल्या वेळेत सादर करू शकतो.
४. सादरीकरणाकरिता किमान ०४ मिनिटे व कमाल ०६ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
५. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

६. सदर कला प्रकाराकरिता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
७. सिंथेसाईझरचा किंवा इतर इलेक्ट्रॉनिक्स वाद्यांचा सादरीकरणाकरिता वापर करता येईल.
८. चित्रपटातील गाणे गाण्यास परवानगी असेल.
९. लय, स्वर, ताल, ठेका, रचना आणि सर्वसामान्य सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारित राहील.

**९) पाश्चिमात्य वाद्यसंगीत (Western Instrumental - Solo)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. सादरीकरणासाठी पाश्चिमात्य स्वरवाद्य अथवा तालवाद्य वापरता येईल.
३. सादरीकरणाकरिता किमान ०५ मिनिटे व कमाल ०७ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
४. सदर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करण्यात येईल.
५. गाणे हे एक किंवा अधिक पाश्चिमात्य शैलींचे मिश्रण असु शकते.
६. साथीदाराला सिंथेसाईझरचा किंवा इतर इलेक्ट्रॉनिक्स वाद्यांचा सादरीकरणाकरिता वापर करता येईल.
७. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
८. ताल, ठेका आणि शांततेने केलेल्या सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारित राहील.

**१०) पाश्चिमात्य समूहगान (Group Song - Western)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. एका संघामध्ये किमान ०४ (चार) आणि कमाल ०६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील. तथापि, गायक हे सादरीकरणादरम्यान वाद्ये वाजवू शकतील.
३. चित्रपट गीते सादर करता येतील. समुहगान मध्ये विद्यार्थी दिलेल्या वेळेत एकापेक्षा अनेक गीते सादर करी शकतील.
४. प्रत्येक चमूला सादरीकरणाकरिता किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा वेळ उपलब्ध राहील. ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापि, मंच व वाद्य रचनेकरिता ०५ (पाच) मिनिटांचा अधिक कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
५. प्रत्येक चमूला दोन गाण्यांचे सादरीकरण करावे लागेल ज्यामध्ये एक गीत देशभक्तीपर तर दुसरे गीत लोकसंगीतावर आधारित राहील.
६. सादरीकरणाकरिता निवडण्यात येणारे गीत केवळ इंग्रजी भाषेत असावे-
७. समूहगाणाचे परीक्षण हे संगीत रचना, गाण्याची निवड, एकसारखेपणा, गाण्याचा दर्जा, सादरीकरण व सर्वसामान्य प्रभावावर आधारीत असेल. मात्र वेषभूषा व रंगभूषा यांवर गुणदान अवलंबून राहणार नाही.

## २. नृत्य विभाग (Dance Section)

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) कलावंत या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२. शास्त्रीय नृत्य हे कोणत्याही अधिकृत नृत्य शाळेतील मान्यताप्राप्त प्रकारावर आधारित असावे. जसे कथ्थक, कथकली, ओडीसी, भरतनाट्यम, मणीपुरी, कुचीपूडी, मोहिनीअट्टम इ.
३. सादरीकरणाकरिता किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटांचा कालावधी दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
४. रंगमंचावर वाद्य साहित्य लावण्यासाठी ०३ (तीन) मिनीटांचा कालावधी दिला जाईल.
५. कमाल ०३ (तीन) साथीदार या कलाप्रकाराकरिता साथसंगत करू शकतील.
६. चित्रपटातील शास्त्रीय नृत्ये या प्रकारात चालणार नाहीत.
७. पंचाचा निर्णय हा ताल, तंत्र, लय, हवभाव, वेशभुषा, पदलालित्य व सर्वसामान्य सदरीकरणाच्या प्रभाव यावर अवलंबून असेल.
८. कलावंतास नृत्याचे स्पष्टीकरण देणारे सारांश आणि साथीला उपयोगात आणल्या जाणारे गीत त्यांचे मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमध्ये अनुवाद करून नोंदणी करते वेळी ०३ (तीन) प्रतींमध्ये नोंदणी कक्षावर सादर करावे लागेल.

## २) भारतीय लोक समुहनृत्य (Indian Folk Dance - Group Dance)

१. प्रत्येक महाविद्यालयतून एक संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. किमान ०८ (आठ) व कमाल १० (दहा) स्पर्धक या कलाप्रकारात सहभाग घेऊ शकतील. ज्यामध्ये केवळ मुले / मुली अथवा मिश्रगट सहभागी होऊ शकेल.
३. लोकनृत्य / आदिवासी नृत्य भारतीय शैली मधील असावे. यामध्ये शास्त्रीय नृत्यांचा समावेश नसावा.
४. कलाप्रकाराच्या सादरीकरणाकरिता किमान ८ मिनिटे व कमाल १० मिनिटांचा कालावधी दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
५. रंगमंच तथा वाद्यवृंद व्यवस्थेकरिता ५ (पाच) मिनिटांचा कालावधी उपलब्ध करून दिला जाईल
६. कमाल ०५ (पाच) साथीदार या कलाप्रकाराकरिता साथसंगत करू शकतील.
७. चित्रपटातील लोक / आदिवासी नृत्ये या प्रकारात चालणार नाहीत.
८. ध्वनीमुद्रीत संगीत या प्रकारात चालणार नाहीत.
९. पंचाचा निर्णय हा अस्सलपणा, अधिकृतपणा, ताल, सांघिकपणा, भावमुद्रा, वेशभूषा, रंगभूषा, व सर्वसाधारण सादरीकरणाचा प्रभाव यावर आधारीत राहील.
१०. नोंदणी कक्षामध्ये सादरीकरण करत असलेल्या लोकनृत्याची संकल्पना व संपूर्ण लोकगीत व सारांश ०३ (तीन) प्रतींमध्ये सादर करावे लागेल.
११. सहभागी चमूचे सादरीकरणानंतर रंगमंचावर केलेली सजावट तथा साहित्य काढून नेण्याची जबाबदारी सहभागी चमूची राहील त्या करिता ०२ (दोन) मिनीटांचा वेळ आरक्षीत केलेला असेल.

## ३.वाड्मयीन कला विभाग (Literary Event Section)

### १) वक्तृत्व स्पर्धा (Elocution)

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. सादरीकरणाकरिता मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा उपयोग करावा लागेल.

३. प्रत्येक वक्त्याला किमान ०४ मिनिटे व कमाल ०५ (पाच) मिनिटांचा अवधी सादरीकरणाकरिता उपलब्ध करून दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
४. वक्तृत्वाचे विषय व्यवस्थापकांच्या सभेध्ये सांगितले जातील.
५. सादरीकरण हे फक्त गद्यावर आधारित असावे व यामध्ये कवीतांचा व गीतांचा वापर करता येणार नाही.
६. कुठल्याही प्रकारचे वाचन करण्यास मनाई आहे.
७. विषयाची ओळख, ज्ञान, अभ्यास, सादरीकरण, भाषेची पध्दत आणि सर्वसाधारण सादरीकरण यांवर पंचाचा निर्णय आधारभूत असेल.

**२.वादविवाद स्पर्धा (Debate)**

१. वादविवादाकरिता प्रत्येक महाविद्यालयतून ०२ (दोन) विद्यार्थी सहभागी असतील.
२. वादविवादाचे विषय व्यवस्थापकांच्या सभेध्ये सांगितले जातील.
३. पहिला वक्ता विषयाच्या बाजूने बोलेल आणि दुसरा वक्ता विषयाच्या विरोधी बाजूने बोलेल.
४. दोन्ही सहभागी स्पर्धक मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत सादरीकरण करतील तथापी दोन्ही स्पर्धक एकाच भाषेत अथवा वेगळ्या भाषेत सादरीकरण करू शकतील परंतु एक सहभागी स्पर्धक एकाच भाषेत सादरीकरण करेल.
५. प्रत्येक स्पर्धकाला किमान ०४ मिनिटे व कमाल ०५ (पाच) मिनिटांचा अवधी सादरीकरणाकरिता उपलब्ध असेल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
६. वाचून सादरीकरण करता येणार नाही.
७. विषयाची ओळख, ज्ञान, विषयाचा अभ्यास, विषय, सादरीकरण, भाषेची पध्दत आणि सर्वसाधारण सादरीकरण यांवर पंचाचा निर्णय आधारभूत असेल.

**३.प्रश्नमंजुषा (Quiz)**

१. या कलाप्रकारात ०३ (तीन) विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी होऊ शकेल.
२. प्राथमिक फेरी आणि अंतीम फेरी अशा दोन फेऱ्यांध्ये स्पर्धा होईल.
३. प्राथमिक फेरीत सहभागी संघांची लेखी परिक्षा होईल, प्रश्नांची उत्तरे बहु पर्यायी स्वरूपात असेल. स्पर्धेचे माध्यम हे इंग्रजी असेल. लेखी परीक्षेसाठी फक्त १५ (पंधरा) मिनिटांचा अवधी दिला जाईल
४. प्राथमिक फेरीमधून ०६ (सहा) संघ गुणवत्तेच्या आधारावर अंतीम फेरीकरिता निवडले जातील.
५. अंतिम फेरीमध्ये मौखिक तथा दृकश्राव्य आधारित प्रश्न विचारले जातील.
६. अंतीम फेरीचे नियम, परिक्षण पध्दत, विशेष प्रश्नांची उत्तरे देण्याची वेळ आणि फेरीतील टप्पे इ. परिक्षक अंतीम फेरीच्या वेळेस घोषीत करतील.

## ४. रंगमंचीय कला विभाग (Theatre Section)

### १) नक्कल (Mimicry)

१. प्रत्येक महाविद्यालयामधून एक (१) विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकेल.

२. सादरीकरणाकरिता किमान ०४ मिनिटे व कमाल ०५ (पाच) मिनिटांचा कालावधी उपलब्ध राहील. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरू होईल.
३. सहभागी स्पर्धक उपकरणांचा, विशेष नावाजलेल्या व्यक्तीमत्त्वांचा व भाषणांच्या आवाजाची नक्कल करू शकतो.
४. रंगमंचावर सादर करणारे पात्र घोषीत करण्याची मान्यता आहे.
५. परिक्षण हे अनुकरणाचे कौशल्य, ध्वनी आणि आवाजाची विविधता यावर आधारीत असेल.

**२)एकांकिका (One Act Play)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून किमान ०२ (दोन) व कमाल ०९ (नऊ) कलावंत भाग घेऊ शकतील.
२. सादरीकरणाचा कालावधी किमान २५ (पंचवीस) मिनिटे व कमाल ३० (तीस) मिनिटे इतका असेल.
३. रंगमंचावर देखावा (Set) उभारणे व प्रकाश योजना करण्यासाठी १० (दहा) मिनिटांचा व एकांकिका संपल्यानंतर देखावा (Set) व प्रकाश योजना काढून घेण्यासाठी ०५ (पाच) मिनिटांचा कालावधी दिला जाईल
४. सहकलाकारांची संख्या जास्तीत जास्त ०३ (तीन) राहील.
५. सहभागी महाविद्यालय संघाला एकांकिकेसाठी लागणारा स्वतःचा सेट, रंगमंचावर लागणारे साहित्य, रंगभूषा व वेशभूषेसाठी लागणारे साहित्य इ. स्वतः आणावे लागेल.
६. आयोजक महाविद्यालयाला पर्याप्त लाईट व आवश्यक इतर साहित्याची आगाऊ माहिती दिल्यानंतर त्याचा पुरवठा शक्य असल्यास पुरविला जाईल.
७. बॉक्स सेट वापरण्यास मनाई आहे.
८. सादर करण्यात आलेल्या एकांकीकेच्या लेखकाची आवश्यक परवानगी, सेन्सॉर प्रमाणपत्र इ. घेण्याची जबाबदारी संबंधीत सहभागी विद्यापीठाची राहील.
९. एकांकिकेचा दर्जा, विषय, अभिनय, निर्देशन, सादरीकरणाचा प्रभाव इ. च्या आधारावर परिक्षण केले जाईल.

**३.मूक अभिनय (Mime)**

१. एका महाविद्यालयतून संघामध्ये किमान ०४ (चार) व कमाल ०६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील.
२. सहभागी स्पर्धक पांढऱ्या व काळ्या रंगाची वेशभूषा परिधान करतील आणि चेहरा, भुवया व ओठ रंगवतील.
३. सादरीकरणाकरिता किमान ०४ (चार) व व कमाल ०५ (पाच) मिनिटांचा कालावधी दिला जाईल. आयोजकांच्या अंतीम उद्घोषणेनंतर स्पर्धकांनी त्वरीत सादरीकरण करावे
४. रंगमंचावरील व्यवस्था/संगीत उपकरणांची व्यवस्था करणेसाठी कमाल कालावधी ०३ (तीन) मिनीटांचा राहील.
५. जास्तीत जास्त ०२ (दोन) सहकलाकारास मान्यता असेल.
६. अभिनयाच्या माध्यमातून दिलेल्या विषयाचे महत्त्व, चेहऱ्यावरील हावभाव व अभिनय यास महत्त्व दिले जाईल. कुठल्याही साहित्याचा वापर करण्यास मनाई राहील. तथापी मुकअभिनयाचे सादरीकरण प्रभावशील होण्यासाठी संगीताचा वापर करण्यास परवानगी असेल.

७. कल्पकता, सर्जनशीलता, सादरीकरण, वेषभूषा व सर्वसामान्य प्रभाव या आधारावर परीक्षण केले जाईल.

**४.प्रहसन (Skit)**

१. एका महाविद्यालयतून संघामध्ये किमान ०४ (चार) व कमाल ६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील.
२. सादरीकरणाकरिता किमान ०८ (आठ) व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल. आयोजकांच्या अंतीम उद्घोषणेनंतर किंवा पडदा पूर्ण उघडल्यानंतर या पैकी जे आधी असेल त्या प्रमाणे स्पर्धकांनी त्वरीत सादरीकरण करावे.
३. रंगमंचावरील व्यवस्था / संगीत उपकरणांची व्यवस्था करणेसाठी कमाल कालावधी ०३ (तीन) मिनीटांचा राहील.
४. जास्तीत जास्त ०३ (तीन) सहकलाकारास मान्यता असेल.
५. प्रहसन सर्वसामान्यप्रमाणे राष्ट्रीय किंवा सामाजिक विषयावर प्रकाश टाकणारा महत्त्वाचा असावा.
६. सादरकरणामध्ये वैयक्तिक टिका, कुत्सीतपणा, कडवटपणा, अश्लिलपणा इ. करण्यास मनाई राहील. निरागसपणे व विनोदबुध्दीने केलेले सादरीकरण अपेक्षीत असेल.
७. विषयाचा दर्जा, अभिनय, समन्वय आणि सर्वसाधारण सादरीकरणाचा प्रभाव या आधारावर परिक्षण केले जाईल.

## ५. ललितकला विभाग (Fine Arts Section)

**१) स्थळचित्र (On The Spot Painting)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने /आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत स्थळचित्र स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.
४. चित्र काढण्यासाठी दिलेला कागदाचा अर्थ शाही आकार असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी. सदरील कागद हा आयोजक विद्यापीठ पुरवेल.
५. काढण्यात येणारे तैलचित्र, पाणी, पोस्टर किंवा पेस्टल रंगामध्ये काढता येईल.
६. रंगकामाकरिता आवश्यक असलेले साहित्य जसे कुंचले, रंग, पेन्सील आदी स्पर्धकास स्वतः आणावे लागेल.
७. स्थळचित्राचा बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, जुळणी, रंगांचा उपयोग व सर्वसमावेशक प्रभाव या वर आधारीत परिक्षण केले जाईल.

**२) चिकटकला (Collage)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. २. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने /आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत चिकटकला स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही किमान २ तास व कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.
४. चिकटकलेसाठी दिलेला माऊंट बोर्ड पेपर हा अर्ध शाही आकाराचा असावा. म्हणजे २२ इंच व १५ इंच रुंदी. सदरील माऊंट बोर्ड पेपर हा आयोजक विद्यापीठ पुरवेल.

५. चिकटकला ही जुन्या मासिकातुन बनवायची आहे व ही जुनी मासिके आयोजक विद्यापीठ पुरवेल.

६. चिकलटकलेसाठी लागणाऱ्या वस्तू व इतर आवश्यक साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावे.

७. चिकटकलेचा बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, जुळणी, रंगांचा उपयोग व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत परिक्षण केले जाईल.

### ३) पोस्टर मेकिंग (Poster Making)

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.

२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने / आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत पोस्टर स्पर्धास्थळी काढावे लागेल.

३. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.

४. चिकटकलेसाठी दिलेला माऊंट बोर्ड पेपर हा अर्थ शाही आकाराचा असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी. सदरील माऊंट बोर्ड पेपर हा आयोजक विद्यापीठ पुरवेल.

५. पोस्टरकरिता आवश्यक असलेले साहित्य जसे कुंचले, रंग, पेन्सील आदी स्पर्धकास स्वतः आणावे लागेल.

६. काढण्यात येणारे पोस्टर पाणी, पोस्टर किंवा पेस्टल रंगामध्ये काढता येईल.

७. पोस्टरचा बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, जुळणी, रंगांचा उपयोग, पोस्टरचा सर्वसमावेशक प्रभाव व घोषवाक्य यावर आधारीत परिक्षण केले जाईल.

### ४) माती कला (Clay Modelling)

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.

२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने /आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत मातीकला स्पर्धास्थळी करावी लागेल.

३. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.

४. मातीकलेसाठी लागणारी माती ही आयोजक विद्यापीठातर्फे पुरविण्यात येईल.

५. मातीकलेसाठी लागणारे सर्व साहित्य हे स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे.

६. मातीकलेचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची हाताळणी, मातकामाची हातोटी, जुळणी, सादरीकरण व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत राहिल.

### ५)व्यंगचित्रे (Cartooning)

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.

२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने /आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत व्यंगचित्र स्पर्धास्थळी काढावे लागेल.

३. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.

४. चित्र काढण्यासाठी दिलेला कागदाचा अर्थ शाही आकार असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी. सदरील कागद हा आयोजक विद्यापीठ पुरवेल.

५. व्यंगचित्रासाठी आवश्यक असलेले साहित्य जसे कुंचले, रंग, पेन्सील आदी स्पर्धकास स्वतः आणावे लागेल.

६. व्यंगचित्राचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, व्यंगचित्रातील पात्रं, रंगांचा उपयोग व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत असेल.

**६.रांगोळी (Rangoli)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.
३. रांगोळीसाठी लागणारी जागा ही १२० सें.मी. १२० सें.मी. इतकी असेल.
४. कला सादरीकरणात रांगोळी पावडर, रंगीत पावडर चा वापर करता येईल.
५. रांगोळीसाठी लागणारे साहित्य स्पर्धकाला स्वतः आणावे लागेल.
६. रांगोळीचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, रांगोळीतील घटक, रंगांचा उपयोग व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत असेल.

**७.स्थळ छायाचित्रण (Spot Photography)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धकाने स्वतःचा डिजीटल कॅमेरा सोबत आणावा.
३. डिजिटल कॅमेऱ्यामध्ये मेरी कार्ड असावे. स्पर्धा आरंभ होण्यापूर्वी परीक्षकांद्वारे मेरी कार्ड फॉरमॅट केले जाईल.
४. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.
५. स्पर्धकाने दिलेल्या विषयावर फक्त ०५ (पाच) छायाचित्रे ही परिक्षकांकडे द्यावीत.
६. छायाचित्रांचे मिक्सिंग, मॅचिंग किंवा मॉर्किंग करता येणार नाही.
७. फोटोशॉप, पिकासा इत्यादीसारखे सॉफ्टवेअर वापरण्याची अनुती राहणार नाही.
८. काढलेली छायाचित्रे आवश्यक त्या ठिकाणी वापरण्याची अनुती आयोजकांना राहील.
९. उपरोक्त व्यतिरिक्त अधिक सूचना वेळेवर देण्यात येईल.
१०. डिजिटल इमेजेसचे परीक्षण हे विशिष्ट विषयावरील प्रभाव, संरचना, तांत्रिक स्तर व अनुरूपता यावर आधारित केले जाईल.

**८) इंस्टालेशन (Installation)**

१. प्रत्येक महाविद्यालयतून किमान ०३ (तीन) व कमाल ०४ (चार) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकतील.
२. प्रत्येक महाविद्यालय संघाला परिक्षकाने /आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारित इंस्टालेशन स्पर्धास्थळी करावे लागेल.
३. इंस्टालेशन हे ५ फूट x ५ फूट X ५ फूट पेक्षा मोठे नसावे व प्रत्येक विद्यापीठ संघाने एकच इंस्टालेशन सादर करावे.
४. वेळ मर्यादा ही कमाल २ तास ३० मिनिटांची राहील.
५. सहभागी स्पर्धक इतर सर्व ललितकला संबंधीत सर्व कला प्रकारांसाठी लागणाऱ्या साहित्यांचा वापर करू शकतात.
६. सहभागी स्पर्धक परिसरातील टाकाऊ वस्तू किंवा बाहेरून उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही साहित्याचा वापर करू शकतात.

७. सहभागी स्पर्धकाने बाजार पेठेत तयार असलेल्या कुठल्याही वस्तूचा वापर करण्यास मनाई असेल. ते त्यांची कलाकृती ही कच्च्या मालापासून तयार करू शकतात.
८. इंस्टालेशनचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, कामाची हातोटी, सादरीकरण व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत असेल.

## ६) लघु चित्रपट (Short Film Making)

१. नोंदणी प्रक्रियेच्या वेळेस नोंदणी कक्षाकडे प्रत्येक सहभागी विद्यापीठाने तयार केलेला लघु चित्रपट जमा करावा.
२. कोणत्याही विषयावर / कथानकावर सहभागी विद्यापीठाने लघु चित्रपट बनवावा
३. लघु चित्रपटामध्ये सहभागी महाविद्यालयातील विद्यार्थी सर्व प्रमुख / दुय्यम भूमिकेत भाग घेतील. लघु चित्रपट बनविण्याकरिता व सादरीकरण करण्याकरिता विद्यार्थी संख्येवर कोणतेही बंधन नसेल.
४. संबंधीत अधिकाऱ्याकडून लघु चित्रपटाकरिता सेन्सॉर प्रमाणपत्र मिळवण्याची जबाबदारी सहभागी विद्यापीठाची राहील.
५. सदरील स्पर्धा ही चित्रपटाच्या संकल्पनेवर आधारीत असल्याणे कोणताही माहितीपट स्विकारला जाणार नाही.
६. लघुचित्रपटातील सारांश/संवाद/गीते/संगीत कोणत्याही जाती धर्मातील व समाजातील व्यक्तींच्या भावना दुखावणारे नसावे.
७. सदरील लघु चित्रपटाचा कालावधी ०५ (पाच) मिनिटांपेक्षा जास्त नसावा. त्यापेक्षा जास्त कालावधी असणाऱ्या लघु चित्रपटाला बाद करण्यात येईल. कमीत कमी लांबी ही ३० सेकंदांची असावी.
८. सहभागी महाविद्याल लघु चित्रपटात कुणालाही श्रेययादीमध्ये समाविष्ट करणार नाही.
९. सदरील लघुचित्रपट मागील कोणत्याही स्पर्धेत / चित्रपट महोत्सवात सादर केला असेल तर तो ग्राहय धरला जाणार नाही. असेकाही नंतर आढळल्यास त्यांस स्पर्धेतून बाद धरण्यात येईल व मिळालेले बक्षीस हे परत घेतले जाईल.
१०. लघु चित्रपट हा एम.पी.ई.जी. ४ किंवा ए. व्ही. आय.च्या साच्यात असावा. शिफारशीत दर १६:९ / १६:९ पूर्ण ॲनॉर्फिक उंचीत डी. व्ही/ एच.डी. व्ही. स्वरूपात असावा.
११. निर्देशन, कथा लेखन, संवाद लेखन, गीत, संगीत निर्देशन, कॅमेरा चित्रिकरण, प्रकाश योजना, कला निर्देशन व संपादन इ. साठी विद्यार्थी स्वतः करू शकतील किंवा इतर बाहय व्यक्तीला त्यासाठी निमंत्रीत करू शकतील. परंतु जर वरील सर्व बाबींमध्ये विद्यार्थ्यांनीच सहभाग घेलतला असेल तर त्यांनाच जास्त श्रेय दिले जाईल.
१२. आयोजकांनी सदरील चित्रपट पडद्यावर दाखवण्याचा व अव्यवसायीक स्तरावर सादरीकरण करण्याचा आधिकार राखीव ठेवला आहे. तसेच इतर राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट स्पर्धेसाठी पाठविण्याचा अधिकार आयोजकांकडे राखीव राहील.
१३. कोणत्याही त्रयस्थाद्वारे विषयांच्या अनधिकृत वापराची जबाबदारी आयोजकांवर राहणार नाही. इतर माध्यमांध्ये विषयाच्या सादरीकरणाची कोणतीही शाश्वती आयोजक देणार नाहीत.
१४. एकदा लघु चित्रपट जमा केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये मागे घेता येणार नाही.

१५. सहभागी महाविद्यालयांनी सादर केलेल्या लघु चित्रपटांचे प्रदर्शन आयोजक विद्यापीठ सादर करेल.

१६. जमा केलेल्या लघुचित्रपटांचे परीक्षण केले जाईल. इंद्रधनुष्य स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीस जाहीर केले जाईल.

१७. लघु चित्रपटाचे परीक्षण हे मूळ विषयावर (कथानकाच्या व लेखनाच्या दर्जावर) निर्मिती (कॅमेऱ्याचे कार्य, देखाव्यांची सुसुत्रता, प्रकाश, चांगले संयोजन) तसेच निर्मिती पश्चात (संपादन, संक्रमण, गतीशीलता, अखंडता व प्रवाह) प्रतिमा (लक्ष केंद्रीत प्रकाश, रंग व प्रकाश योजना) आणि ध्वनीचा दर्जा (सुस्पष्टता, ऐकू येण्याचे सातत्य व अनावश्यक आवाज इ.) या वर आधारीत असेल.

१८. आयोजक महाविद्यालयांनी प्रथम आलेल्या लघु चित्रपटास प्रतिष्ठित राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवात किंवा स्पर्धेत इंद्रधनुष्य (महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवक महोत्सव) राजभवन, मुंबई यांच्या वतीने प्रवेशिका सादर करेल.

## ७) शोभायात्रा (Procession)

१. सांस्कृतिक रॅलीचे आयोजन आयोजक विद्यापीठ पहिल्याच दिवशी उद्घाटन समारंभाच्या आधि महाविद्यालय संघ निहाय करेल.

२. सांस्कृतिक रॅलीमध्ये सहभागी महाविद्यालयांनी प्रत्येक विद्यार्थ्याने सहभाग घेणे बंधनकारक राहील.

३. सांस्कृतिक रॅलीमध्ये सहभागी महाविद्यालयांनी संघ राष्ट्रीय/सामाजिक महत्त्वाच्या विषयावर /संकल्पनेवर त्यांचे सादरीकरण करेल. किंवा ते त्यांच्या प्रादेशीक सांस्कृतिक रिती रिवाजाप्रमाणे किंवा वैशिष्ठ्यांवर आधारीत विषय सादर करतील.

४. रॅलीच्या दरम्यान सहभागी महाविद्यालय संघ ध्वजासह संचलनात सहभाग घेतील.

५. रॅलीचे परिक्षण हे विषयाची कल्पना, मांडणी, वेशभूषा, सादरीकरण व एकंदरीत सर्व प्रभावानुसार होईल.

## सामान्य मार्गदर्शक तत्त्वे

१. **स्पर्धक व इतर संख्या** ; नव्या (२०२२) राजभवनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रत्येक महाविद्यालचा संघ २२ विद्यार्थी, ४. वाद्य वादक २ संघ व्यवस्थापक एकूण २८ जणांचा असावा. शक्यतोवर साथसंगत करणारे विद्यार्थीच असावेत. परंतु जर विद्यार्थी उपलब्ध नसतील तर व्यावसायिक कलावंतांना सहवादक म्हणून सहभागी करता येईल.

# कृषि विद्यापीठ शहीदांना नमन



स्व. नेमिचंद गोपाल



स्व. नरेंद्र देशमुख



स्व. गजानन देवघरे





स्व. सुरेश भडके



स्व. शेख रफिक



स्व. सुरेश वानखडे



स्व. सुरेश कुऱ्हे



स्व. भिरुमल रिझमल



स्व. प्रफुल्लचंद्र कोठारी